पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

## प्रेसनोट दि. ०२/०९/२०२४

### मा. राष्ट्रपती महोदय, यांचे पुणे दौऱ्याचे अनुषंगाने मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे या मार्गावरील हलकी, जड, अवजड वाहतुक वळविलेबाबत..

सिम्बायोसिस युनिव्हर्सिटी, लवळे पुणे येथे दिनांक ०३/०९/२०२४ रोजी मा. राष्ट्रपती महोदय, भारत सरकार यांचा दौरा असल्याने दौरा मार्गावर वाहतुक कोंडी होऊ नये व कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी याकरीता उपाययोजना म्हणून मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडील जा.क्र पगक/कावि/३७४१/२०२४ दिनांक २९/०८/२०२४ अन्वये खालील प्रमाणे दिनांक ०३/०९/२०२४ रोजी पहाटे ००.०१ वाजेपासून दुपारी १६.०० वाजेपर्यंत दौरा मार्गावरील वाहतूक वळविलेबाबतची अधिसुचना प्रसारित केलेली आहे.

- मौजे नांदेगाव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड-अवजड वाहनांची वाहतुक बंद केली असून सदर मार्गावरील वाहतूक नांदेगाव-माले येथून हिंजवडी मार्गे पुणे तसेच नांदेगाव-पिरंगुट-चांदणी चौक मार्गे पुणे अशी वळविण्यात आलेली आहे.

तरी नागरीकांनी मौजे नांदेगाव - सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे बाजुकडे न जाता त्यांनी नांदेगाव-माले येथून हिंजवडी मार्गे पुणे तसेच नांदेगाव-पिरंगुट-चांदणी चौक मार्गे पुणे या पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेमार्फतीने करण्यात येत आहे.

सोबत:- मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडील जा.क्र पगक/कावि/३७४१/२०२४ दिनांक २९/०८/२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचनेची प्रत

02/09/2024

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२) प्रभारी अधिकारी बावधन वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड

/- नमुद अधिसुचनेप्रमाणे योग्य तो बंदोबस्त नेमुन मा. राष्ट्रपती महोदय, यांचे दौरा मार्गावर हलकी, जड-अवजड वाहने येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच सदर मार्गावर वाहतूक कोंडी किंवा अन्य समस्या निर्माण होणार नाहीत अशी उपाययोजना करावी.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा)

ए-विंग, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, ससून हॉस्पीटल समोर, पुणे- ४११.००१
ईमेल- homebranchpune@gmail.com

वाचा - १) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे क्र. जि.वा.शाखा/वाहतुकवळविणे/२८८/२०२४, दि.२९/०८/२०२४ रोजीचे पत्र
२) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूद
३) शासन गृह विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६०/टीआर-२, दि.१९/०५/१९९०.

---

क्र. पगक/कावि/३७४१/२०२४ दिनांक - २९/०८/२०२४.

विषय :- मा. राष्ट्रपती महोदय, यांचे पुणे दौऱ्याचे अनुषंगाने वाहतुक वळविणेबाबत.

**अधिसूचना**

ज्याअर्थी, संदर्भीय क्र. १ अन्वये पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी प्रस्ताव दाखल केला असून सदर प्रस्तावात मा. राष्ट्रपती महोदय, भारत सरकार यांचा दि.०२/०९/२०२४ व दि.०३/०९/२०२४ रोजी पुणे शहरात दौरा होणार असून ते सिम्बॉयोसिस युनिर्व्हसिटी, लवळे पुणे येथील दि.०३/०९/२०२४ रोजी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सदर दौरा कार्यक्रमासाठी उपस्थिती व्हीव्हीआयपी यांचे सुरक्षिततेकरीता कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी दौरा कालावधीत वाहतुक कोंडी होऊ नये त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून दि.०३/०९/२०२४ रोजी पहाटे ००:०१ वाजले पासून दुपारी ०४:०० वाजेपर्यंत मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड-अवजड वाहनांची वाहतुक बंद करुन ती पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. राष्ट्रपती महोदय, भारत सरकार यांचे सिम्बॉयोसिस युनिर्व्हसिटी, लवळे पुणे येथील दि. २९/०७/२०२४ रोजीचे दौरा कालावधी वाहतुक कोंडी होऊ नये व कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी यासाठी उपाय योजना म्हणून मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड-अवजड वाहनांची वाहतुक बंद करुन ती पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, डॉ. सुहास दिवसे, **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे मला मोटार वाहन कायदा- १९८८ चे कलम ११५** मधील तरतुदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसूचनेनुसार मला प्राप्त अधिकाराने मा. राष्ट्रपती महोदय, भारत सरकार यांचे सिम्बॉयोसिस युनिर्व्हसिटी, लवळे पुणे येथील दौरा कार्यकमाचे कालावधी वाहतुक कोंडी होऊ नये व कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी उपाय योजना म्हणून दि.०३/०९/२०२४ रोजी पहाटे ००:०१ वाजले पासून दुपारी ०४:०० वाजेपर्यंत मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड-अवजड वाहनांची वाहतुक बंद करुन ती खालील पर्यायी मार्गावरुन वळविण्याचे आदेश देत आहे.

- **मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड- अवजड वाहनांची वाहतुक बंद करुन ती नांदेगांव -माले येथून हिंजवडी मार्गे पुणे तसेच नांदेगांव-पिरंगुट- चांदणी चौक मार्गे पुणे अशी जातील.**

सदरची अधिसूचना ही पोलीस विभागाची वाहने, महसूल विभागाची वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलीस विभागाने परवानगी दिलेल्या व कार्यक्रमाशी संबंधीत यंत्रणांच्या वाहनांसाठी निर्बंध शिथील करण्यात येत आहे.

सदरची अधिसूचना आज दि.२९/०८/२०२४ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

जिल्हादंडाधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

(डॉ. सुहास दिवसे)
जिल्हादंडाधिकारी, पुणे
२९/८

प्रति, पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे, यांना पुढील उचित कार्यवाहीसाठी रवाना
२/- सदर अधिसूचना प्रसारमाध्यमांद्वारे त्वरित पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर ठिकाणी वाहतूक वळविल्याचे फलक योग्यठिकाणी बसविण्याचे कार्यवाही करावी. वाहतूक कोंडी होणार नाही या दष्टीने उपाय योजना करण्याची कार्यवाही करावी

Scanned with CamScanner